महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.५/२१२७१
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक ११.०८.२०२२

# परिपत्रक

**विषय:-** **स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त स्वराज्य सप्ताह अंतर्गत समूह राष्ट्रगीत गायनाबाबत.**

**संदर्भ:** - १) परिपत्रक क्र.मासंवि/रवका/न.क्र.५/१८६४४ दि.१४.०७.२०२२
२) परिपत्रक क्र.मासंवि/रवका/न.क्र.५/१९३९२ दि.२१.०७.२०२२.
३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-८२२२/प्र.क्र.२४४ सां.का.४ दि.१०.०८.२०२२.

भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ वर्षे पूर्ण होण्याच्या पार्श्वभूमीवर देशात सर्वत्र **"आजादी का अमृत महोत्सव"** अर्थात **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. दिनांक १५ऑगस्ट २०२३ पर्यंत सुरु राहणाऱ्या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम विविध पातळीवर आयोजित करणे अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भित परिपत्रक क्र.१ व २ नुसार यापूर्वी शासनामार्फत देण्यात आलेल्या सूचना क्षेत्रीय कार्यालयांना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. आता, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन परिपत्रक दि.१०.०८.२०२२ अन्वये **"स्वराज्य महोत्सव"** अंतर्गत राज्यस्तरावरील कार्यक्रमाच्या नियोजनामधील **"सामुहीक राष्ट्रगीत गायन"** हा उपक्रम दि.१७.०८.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता राबविण्याबाबतच्या सुचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

३. त्या अनुषंगाने महावितरण कंपनीतील सर्व क्षेत्रीय कार्यालयांना निर्देशित करण्यात येते की, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-८२२२/प्र.क्र.२४४ सां.का.४ दि.१०.०८.२०२२ मध्ये निश्चित केलेल्या स्वरुपानुसार आपल्यास्तरावर कंपनीतील सर्व कार्यालयांमध्ये **"सामुहीक राष्ट्रगीत गायनाचा"** उपक्रम राबविण्यात यावा.

सोबत: शासन निर्णय दि.१०.०८.२०२२

(अ.म.खांदेकर)
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**
संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.

३) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

-- आपणांस निर्देशित करण्यात येते की, उपरोक्त **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** या कार्यक्रमाकरीता योग्य ते नियोजन करावे.

४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

५) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

७) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

“स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” निमित्त
“स्वराज्य सप्ताह” अंतर्गत समूह राष्ट्रगीत
गायनाबाबत.

# महाराष्ट्र शासन

## पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. २४४/सां.का.४**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १० ऑगस्ट, २०२२

वाचा :- १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र.१६१/सां.का.४, दिनांक ३० जून, २०२२
२) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. सां.का.सं./मानधन/२०२१-२२/२१२१, दिनांक २ ऑगस्ट, २०२२

**शासन परिपत्रक :-**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होण्याच्या पार्श्वभूमीवर देशात सर्वत्र “आजादी का अमृत महोत्सव” अर्थात “स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत सुरु राहणाऱ्या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम विविध पातळीवर आयोजित करणे अपेक्षित आहे. राज्यातही या उपक्रमांतर्गत विविध पातळीवर कार्यक्रमाचे आयोजन सुरु आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवांतर्गत उपर्निर्दिष्ट क्र. १ अन्वये दिनांक ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीमध्ये राज्यात “स्वराज्य महोत्सव” चे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. “स्वराज्य महोत्सव” अंतर्गत राज्यस्तर / जिल्हास्तर / तालुकास्तर व ग्रामस्तरावर आयोजित करावयाच्या कार्यक्रम / उपक्रम यांचे स्वरुप निश्चित केले आहे.

२. “स्वराज्य महोत्सव” अंतर्गत परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्यानुसार राज्यस्तरावरील कार्यक्रमांच्या नियोजनामधील “समूह राष्ट्रगीत गायन” हा उपक्रम आता दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता राबवावयाचा आहे.

३. “स्वराज्य महोत्सव” अंतर्गत “समुह राष्ट्रगीत गायन” या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांना खालीलप्रमाणे सर्वसाधारण सूचना देण्यात येत आहेत.

1. दिनांक १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११:०० वाजता एकाच वेळी राज्यात सर्वत्र समूह राष्ट्रगीत गायन होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

या राष्ट्रगीत गायनासाठी राज्यातील खाजगी, शासकीय तसेच इतर सर्व प्रकारच्या शाळा/ महाविद्यालये /शैक्षणिक संस्था/ विद्यापीठे यामधील विद्यार्थी, शिक्षक यांचा सहभाग अनिवार्य असेल.

३. सकाळी ठीक ११:०० वाजता समूह राष्ट्रगीताला सुरुवात होईल व सकाळी ११:०० ते ११:०१ या एका मिनिटांमध्ये राष्ट्रगीत गायन करणे अपेक्षित आहे, याची सर्व संबधितांनी दक्षता घ्यावी.

४. समूह राष्ट्रगीत गायनाच्या वेळी जाणते-अजाणतेपणे राष्ट्रगीताचा अवमान होऊ नये, याची दक्षता घेण्याबाबत नागरिकांमध्ये सर्व स्तरावर जाणीव जागृती निर्माण करण्याची सर्व संबंधितांनी विशेष काळजी घ्यावी.

५. सर्व संबंधित यंत्रणांनी राज्यातील सर्व नागरिकांना दिनांक १७ ऑगस्ट रोजी, सकाळी ११.०० वाजता आहे त्या ठिकाणी थांबून राष्ट्रगीत गायन करण्याचे आवाहन करण्यात यावे.

६. खाजगी आस्थापना, व्यापारी प्रतिष्ठाने, संस्था, शासकीय व निम शासकीय कार्यालये, केंद्र शासन व राज्य शासनाशी संबंधित कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी यांनीही या उपक्रमात सक्रीय सहभाग घेणे आवश्यक राहील, याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

७. शाळा / महाविद्यालय /शैक्षणिक संस्था/ विद्यापीठे येथे या उपक्रमाबाबत सर्व विद्यार्थ्यांना अगोदरच विस्तृत माहिती देण्यात यावी. सर्व सरकारी / खाजगी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्था / शासकीय व निम शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना सदर उपक्रमात सहभागी होणे अनिवार्य राहील.

८. राष्ट्रगीत गायनासाठी विद्यार्थ्यांनी मोकळे पटांगण, वर्ग खोली, किंवा हॉल या ठिकाणी एकत्रित उपस्थित राहावे, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी यांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग होणे आवश्यक राहील, यासाठी शालेय शिक्षण विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून सर्व संबंधितांना निर्देश द्यावेत.

९. ग्राम स्तरावर, वॉर्ड स्तरावर (नगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायत/ महानगरपालिका स्तरावर), सर्व प्रशासकीय अधिकारी व पदाधिकारी यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, यासाठी ग्राम विकास व पंचायत राज विभाग व नगर विकास विभाग यांनी सर्व संबंधितांना निर्देश द्यावेत.

१०. जिल्हाधिकारी यांनी या उपक्रमासाठी जिल्ह्याचे संनियंत्रण करावे, तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय निमशासकीय, सहकारी तसेच खाजगी आस्थापना, व्यापारी प्रतिष्ठाने, संस्था यांना जिल्हाधिकारी स्तरावरून या उपक्रमाबाबत अवगत करून समूह राष्ट्रगीत गायनासाठी जाहीर आवाहन करावे. तसेच तालुकास्तरावर तहसीलदार यांनी या उपक्रमाचे संनियंत्रण करावे.

११. या कार्यक्रमाच्या जाणीव जागृती आणि प्रचार व प्रसिद्धीसाठी मोठ्या प्रमाणात मुद्रित साधने, समाज माध्यमे, खाजगी वाहिन्या, रेडिओ, एफ एम रेडिओ, कम्युनिटी रेडिओ इत्यादी माध्यमांचा वापर करावा.

४. स्थानिक स्वराज्य संस्था, महसूल यंत्रणा, सर्व विद्यापीठे, शाळा व महाविद्यालये, पोलीस यंत्रणा अशा सर्व सामान्य नागरिकांच्या दैनंदिन बाबीशी निगडीत यंत्रणांद्वारे समुह राष्ट्रगीत गायन हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी या उपक्रमाच्या जाणीव-जागृती व प्रसार व प्रचार मध्ये सर्व प्रशासकीय विभागांचे मोठे योगदान राहील, याची सर्व संबंधितांनी खातरजमा करावी.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक **२०२२०८१०१८२९२६०२२३** असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सौरभ विजय )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा. सभापती, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मा.मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव मंत्रालय, मुंबई
८. सर्व विभागीय आयुक्त
९. सर्व पोलीस आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३. सर्व आयुक्त, महानगर पालिका
१४. सर्व मुख्य अधिकारी, नगर पालिका / नगर पंचायत
१५. सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी
१६. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखाली सर्व क्षेत्रिय अधिकारी
१७. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१८. निवड नस्ती, सां.का.४